# महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनासाठी अहिल्यानगरला बहारी सायकलने रवाना



**वर्धाः** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे १ व २ फेब्रुवारी रोजी आयोजित महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनासाठी बहारचे संस्थापक किशोर वानखडे, दिलीप विरखडे, अमोल मुनेश्वर आणि ॲड. प्रसाद सोईतकर हे सायकलने रवाना झाले.

बहारचे सायकलस्वार पुलगाव, कारंजा (लाड), मेहकर, जालना, पैठण असा मार्गक्रमण करीत शनिवारी सकाळी शेवगावला संमेलन स्थळी पोचणार आहेत. या प्रवासादरम्यान नागरिकांशी तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत शून्य कर्ब उत्सर्जनासाठी सायकल वापरण्याचा आणि त्याद्वारे पृथ्वीच्या तापमान वाढीला रोखण्यास हातभार लावण्याचा संदेश ते देणार आहेत.

बहार नेचर फाउंडेशनच्या साथींनी गेल्या काही वर्षांपासून कराड, रेवदंडा (अलीबाग), सांगली, सोलापूर, चंद्रपूर येथे झालेल्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाना तसेच यवतमाळ, चंद्रपूर, लोणार येथील विदर्भ पक्षीमित्र संमेलनाना सायकलने उपस्थित राहून एक वेगळा पायंडा निर्माण केला आहे. यापूर्वी, ५ ते १२ नोव्हेंबर हा पक्षीसप्ताह साजरा करण्यात यावा या मागणीचे निवेदन घेऊन बहारी वर्धेवरून मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी सायकलने गेले होते. सायकल हे शून्य कार्बन उत्सर्जक व आरोग्यदायी वाहन असल्यामुळे त्याचा उपयोग नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन कामांसाठी केला पाहिजे, अशी भूमिका बहार नेचर फाउंडेशनने कायम मांडली आहे.

वर्ध्याहून प्रवासाला निघताना या सायकलस्वारांना विनोद सामक, प्राजक्ता विरखडे, दर्शन दुधाने, देवर्षी बोबडे, अतुल शर्मा, जयंत सबाने, दीपक गुढेकर यांनी निरोप दिला. तर बहारचे पदाधिकारी डॉ. बाबाजी घेवडे, संजय इंगळे तिगावकर, राजदीप राठोड, डॉ. आरती प्रांजळे घुसे, पराग दांडगे, घनश्याम माहोरे, पवन दरणे व अन्य पक्षीमित्रांनी सायकलस्वारांना शुभेच्छा दिल्या असून निसर्गप्रेमींनी शेवगाव येथील महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाला मोठ्या संख्येत उपस्थित राहून तेथील वैचारिक व अभ्यासपूर्ण सत्रांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# दररोज ग्रामीण व शहरी भागातील १५ ते २० हजार रुग्ण, शासकीय रुग्णालयाचा घेतात लाभ

**वर्धा/जिमाका:** जिल्ह्यात ग्रामीण आरोग्य संस्थेप्रमाणेच १ जिल्हा रुग्णालय, २ उपजिल्हा रुग्णालय आणि ८ ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णालयाप्रमाणेच शहरी भागांतही वेळेत उपचार मिळतो. जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य, उपकेंद्र, नागरी आयुष्यमान मंदिर व हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यरत असून या सर्व शासकीय संस्थेच्या दवाखान्यात दररोज मोफत १५ ते २० हजार बाह्य रुग्णांना सेवा पुरविण्यात येत आहे. जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ३२ प्राथमिक आरोग्य केंद्र, १८३ उपकेंद्र, ३६ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आयुष्यमान आरोग्य मंदीर, ४ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, २१ ऑलोपेथिक दवाखाने, ११ आयुर्वेदिक दवाखाने कार्यरत आहे. या सर्व संस्थाचे कायापालट झाले आहे. त्यामुळे प्राथमिक तपासणीसाठी काही आरोग्य केंद्रात १०० तर काही आरोग्य केंद्रात १५० ते २०० पर्यंत रुग्ण येत आहे. दुर्गम भागात रुग्णांची संख्या कमी आहे. पुर्वीच्या तुलनेत आरोग्य केंद्रातील प्राथमिक सुविधांमध्ये वाढ झाली असुन प्रत्येक उपकेंद्र व आरोग्य केंद्रामध्ये पुरेशा प्रमाणात डॉक्टर उपलब्ध आहे.

सरासरी रोजचे बाह्य रुग्ण

३२ प्राथमिक आरोग्य केंद्रात २ हजार ५०० ते ३ हजार रुग्ण, १८३ उप केंद्रात ३ हजार ते ३ हजार २०० रुग्ण, ३६ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात २ हजार ते २ हजार ५०० रुग्ण, ४ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात ५०० ते ६०० रुग्ण, २१ ऑलोपेथिक दवाखान्यात ५०० ते ६०० रुग्ण, ११ आयुर्वेदीक दवाखान्यात २५० ते ३०० रुग्णाची दररोज मोफत तपासणी करण्यात येत आहे.


तसेच जिल्ह्यात असलेल्या शहरी भागात कार्यरत असलेले जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय यांची रोजची बाह्य रुग्ण संख्या ४ हजार ते ४ हजार ५०० पर्यंत असते. त्यामुळे जिल्ह्यातील सामान्य नागरिकांना आरोग्यच्या समस्या घेऊन खाजगी रुग्णालयामध्ये पैसे खर्च करण्याची आवश्यकता नाही. रुग्णांनी शासकीय संस्थाच्या रुग्णालयात आरोग्यसेवा घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज.पराडकर यांनी केले आहे.

# गर्भलिंग निदान करुन गर्भपात करणाऱ्यांची माहिती देणाऱ्या १ लाखाचे बक्षिस

**वर्धा/जिमाकाः** पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बेटी बचाव बेटी पढाओ मोहिमेअंतर्गत जिल्ह्यामध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता जनसामान्यांना कायद्याची माहिती होण्याकरीता तसेच गभलिंग निदान करुन गर्भपात करण्याकरीता प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तींची माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयाचे बक्षिस देण्यात येणार आहे. यासाठी गर्भलिंग निदान करुन गर्भपात करणाऱ्यांची माहिती असणाऱ्यांनी www. amchimulgimaha.in या संकेत स्थळावर किंवा १८००२३३४४७५/१०४ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी केले आहे.

माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असुन माहिती देणाऱ्या व्यक्तीला खबरी योजनेंतर्गत कोर्ट प्रकरण दाखल केल्यानंतर १ लाख रुपयाचे बक्षिस देण्यात येईल. जिल्हा शल्य चिकित्सकांनी कळविले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी धडकले, दोन औषधी भांडारांना लावले टाळे?



**वर्धाः** जिल्हा परिषदेत प्रशासक राज असून काही विभागाचा अनागोंदी कारभार असल्याची सातत्याने ओरड होत आहे. अशातच मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी सोमवारी वर्ध्यातील दोन औषधी भांडाराला भेट देवून कुलूप लावल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे या औषधी भांडारात नेमकं आहे तरी काय? याबद्दल मिनीमंत्रालयातही चर्चेला चांगलेच उधान आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वर्ध्यातील जाजूवाडी परिसरात जिल्हास्तरीय लस भांडार तर पोस्ट ऑफीस चौकालगत जिल्हास्तरीय औषधी भांडार उभारण्यात आले आहे.

**जिल्हा प्रशासनात उडाली खळबळ, चर्चेला उधाण**

या दोन्ही ठिकाणाहून जिल्ह्यातील आरोग्य विभागाला औषधांचा पुरवठा केला जातो. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान यांनी सोमवारी या दोन्ही औषधी भांडारांना भेट दिली. इतकेच नाही तर त्या दोन्ही भांडारांना कुलूप लावून ते पुढील आदेशापर्यंत न उघडण्याच्या सूचना केल्याची माहिती सुत्रांकडून प्राप्त झाली. सीईओ साहेबांनी अचानक हा निर्णय घेतल्याने आरोग्यच नाही तर मिनी मंत्रालयातील यंत्रणेतही खळबळ उडाली. मंगळवारीही येथे तपासणी करण्यात आल्याने औषधी भांडार चांगलेच चर्चेत आले. पण, ही नियमित तपासणी असल्याचे सांगण्यात आले.

**ही नियमित तपासणीच...**

औषधी भांडाराची दर सहा महिन्यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. त्यामुळेच दोन्ही औषधी भांडाराला भेट दिली. तेथील औषधीसाठा, त्यांची ऑनलाइन नोंद, साठा बुकारवरील नोंद, रुग्णालयाला औषधी पुरविल्यासंदर्भात नोंद तसेच खरेदीबाबतही तपासणी करण्यात आली. याशिवाय मुदतबाह्य औषधी आहेत काय, याचीही पाहणी केली असून नोंदणीमध्ये दिरंगाई होत असल्याचे निर्दशनास आले होते.

## प्रयागराज येथे कुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या नागरिकांनी आपत्कालीन स्थितीत संपर्क करण्याचे आवाहन

**वर्धा/जिमाकाः** उत्तरप्रदेश राज्यातील प्रयागराज येथे कुंभमेळा २०२५ चे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी जात आहे. प्रयागराज येथे महाकुंभसाठी गेलेल्या नागरिकांनी आवश्यकतेनुसार अडचण असल्यास किंवा आपत्कालीन स्थितीत संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. आपत्कालीन स्थितीत संपर्क करण्यासाठी प्रयागराज येथील कंट्रोल रुमचा दुरध्वनी क्रमांक ०५२२/२२३७५१५ असा आहे.


# नगर परिषद कार्यालय देवळी, जि. वर्धा

जा.क्र./नपदे/१३७ दि. ४/२/२०२५

## जाहिर सुचना

**"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"**

**"अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६६ सेवांची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळो-वेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगर विकास विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगरपरिषद देवळी कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपरिषद तर्फे जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी देवळी नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-
प्रशासक
नगर परिषद देवळी

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद देवळी


हे पत्रक प्रकाशक, संपादक, मालक श्री. सुनिल मधुकरराव गावंडे यांनी मुद्रक शेखर वा. खोंडे, दत्तकृपा प्रिंटींग ऑफसेट, मिसाळ ले-आऊट, आलोडी-साटोडा रोड, वर्धा येथे छापून जन सहयोग कार्यालय, मानस मंदिर वार्ड नं. २, वर्धा येथे प्रकाशीत केले. weeklyjansahayog@gmail.com R.N.I. No. 16936/1969 (P.R.N.S.B./WDA/58/2023- 25) M.9881837898